आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
८ ऑगस्ट २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- आयआयटीच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रहिताला प्राधान्य देऊन आपल्या ज्ञानाचा फायदा देशाला मिळावा याचा प्रयत्न करावा असं प्रधानमंत्र्यांचं आवाहन

- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज मुंबई दौऱ्यावर

- भारताची बॅडमिंटनपटू अश्मिता चालिहा ‘कोरिया मास्टर्स सुपर ३००’  बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरीच्या अंतिम फेरीत  दाखल

- हिमाचल प्रदेशात चंबा इथं बस अपघातात सात जण ठार , तर अकरा प्रवासी जखमी

आणि

- देशाच्या उत्तर भागात पावसाचा जोर, जम्मू काश्मीरमधली अमरनाथ यात्रा स्थगित

**<><><><><>**

आयआयटीच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रहिताला प्राधान्य देऊन आपल्या ज्ञानाचा फायदा देशाला मिळावा याचा प्रयत्न करावा असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आयआयटी दिल्लीच्या ५७व्या दीक्षांत सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विद्यार्थ्यांची स्वप्न आणि आत्मनिर्भरतेची आस विकसित भारताची पायभरणी करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यशस्वी विद्यार्थ्यांचं त्यांनी अभिनंदन केलं. यशस्वी विद्यार्थ्यांमधे विद्यार्थिनींचं प्रमाण अधिक असतं तर अधिक आनंद झाला असता असं ते म्हणाले.... होल्ड-बाईट- प्रधानमंत्री

आयआयटी दिल्लीच्या सोनिपत परिसरात नव्याने उभारण्यात आलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक परमप्रज्ञा या उच्च क्षमता प्रसंगणक सुविधेचं उद्घाटन त्यांनी केलं.

केंद्रीय शिक्षम मंत्री प्रल्हाद जोशी, आयआयटी दिल्लीच्या संचालक मंडळाचे सदस्य आणि इतर मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा आज मुंबई दौऱ्यावर आहेत.  राष्ट्रीय नागरी सहकारी वित्त आणि विकास महामंडळाच्या नवीन कार्यालयाचं उद्ढघाटन त्यांच्या हस्ते झालं.

राज्यातल्या नागरी  सहकारी बँक महासंघ तसंच जिल्हा बँक संघटनांच्या प्रतिनिधींशी त्यांनी संवाद साधला. या कार्यक्रमादरम्यान राष्ट्रीय नागरी सहकारी वित्त आणि विकास प्राधिकरण आणि राष्ट्रीय न्यायवैज्ञानिक विज्ञान विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार होत आहे. त्यानंतर सहकारी बँकांची सायबर सुरक्षा अधिक सक्षम करण्याच्या उद्देशानं उभारण्यात आलेल्या सुरक्षा संचालन केंद्राचं उद्घघाटनही शहा यांच्या हस्ते झालं.

**<><><><><>**

झारखंड मध्ये JPSC आणि JSSC परीक्षांमधल्या  कथित अनियमिततेवरून सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, झारखंड सरकार आणि विद्यार्थी शिष्टमंडळ यांच्यात आज चर्चेची दुसरी फेरी सुरु आहे.  दरम्यान, या प्रकरणाचा तपास आणि त्याभोवतीच्या राजकीय हालचालींनीही वेग घेतला आहे. सुमारे दीड तास चाललेल्या या बैठकीत, भरती परीक्षांमध्ये पारदर्शकता असावी, कथित अनियमिततेची निष्पक्ष चौकशी व्हावी आणि भरती प्रक्रियेत व्यापक सुधारणा केल्या जाव्यात, या मागण्यांचा विद्यार्थ्यांनी पुनरुच्चार केला. विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सरकार सकारात्मक पावले उचलेल असं मंत्र्यांनी यावेळी सांगितलं. दरम्यान, सरकार विद्यार्थ्यांच्या समस्यांबाबत संवेदनशील असून चर्चेद्वारे हा प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचं मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

रशियाकडून तेल आणि गॅस खरेदी करणाऱ्या देशांवर दबाव वाढवण्याच्या उद्देशानं अमेरिकेच्या संसदेनं एक विधेयक  बहुमतानं मंजूर केलं  आहे. या विधेयकातल्या तरतुदींमुळे रशियाकडून कच्चे तेल आणि गॅस खरेदी करणाऱ्या भारत, चीन, स्लोव्हाकिया, हंगेरी अशा देशांमधून अमेरिकेत आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर १०० टक्क्यांपर्यंत अतिरिक्त आयात शुल्क लागू करण्याचा मार्ग खुला होणार आहे. याचा थेट परिणाम भारतातल्या निर्यातदारांवर होणार असल्याची शक्यता द गार्डियन या ब्रिटिश वृत्तपत्रात आणि इतर प्रसार माध्यमांनी व्यक्त केली आहे. हे विधेयक रशियाच्या युक्रेनविरुद्ध सुरु असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर रशियावर दबाव निर्माण करण्याच्या अमेरिकेच्या धोरणाचा भाग असू शकतं, असं त्याचं समर्थन करणाऱ्या गटानं म्हटलं आहे. सध्या हे अतिरिक्त आयात शुल्क लागू झालेलं नाही. तसंच या विधयकाचं कायदयात रूपांतर होण्यासाठी आवश्यक प्रक्रिया अजून पूर्ण झालेली नाही.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
८ ऑगस्ट २०२६ - शनिवार

<><><><>

युक्रेनची राजधानी कीव्हजवळ काल रात्रभर झालेल्या रशियाच्या क्षेपणास्त्र हल्ल्यांमध्ये एका बालकासह किमान तीन जण ठार झाले तर इतर तीन जण जखमी झाले. आज पहाटे सुद्धा कीव्हच्या पूर्व भागात हल्ले चढवण्यात आले. दरम्यान, युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की सर्बियाची राजधानी बेलग्रेड इथं पोहोचले आहेत. रशियाच्या क्षेपणास्त्र हल्ल्यांपासून बचाव करण्यासाठी आवश्यक असलेल्या इंटरसेप्टर क्षेपणास्त्रांचा साठा कमी होत असल्याबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली आहे. झेलेन्स्की युक्रेनसाठी अधिक व्यापक आंतरराष्ट्रीय पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत.

<><><><>

मणिपूरमध्ये इंफाळच्या दोन जिल्ह्यातून बंदी घातलेल्या दोन संघटनांच्या चार दहशतवाद्यांना पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्यावर मोठ्या प्रमाणावर खंडणी वसूल केल्याचा आरोप आहे. काकचिंग जिल्ह्यात वाईखोंग पोलीस ठाणे क्षेत्रात बंदी घातलेल्या एसओआरईपीए या संघटनेच्या दोन सदस्यांना त्यांच्या निवासस्थानाजवळ अटक करण्यात आली. तर, इंफाळच्या पूर्व भागातून एसओआरईपीए या संघटनेच्याच आणखी एकाला अटक केली असून असून सेइजंग अवांग इथून पीपल्स लिबरेशन आर्मीच्या एका सदस्याला अटक केली आहे.

<><><><>

दक्षिण कोरियातल्या असान इथं सुरु असलेल्या ‘कोरिया मास्टर्स सुपर ३००’ बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरीच्या अंतिम फेरीत भारताची बॅडमिंटनपटू अश्मिता चालिहा हिनं प्रवेश केला आहे. आज झालेल्या उपांत्य सामन्यात अश्मितानं भारताचीच खेळाडू रक्षिता रामराजवर २१-१३, १६-२१, २१-१३ नं मात करत अंतिम फेरी गाठली. या आधी उपांत्यपूर्व फेरीत अश्मितानं जपानच्या हिना अके या जागतिक क्रमवारीत २२ व्या स्थानावर असलेल्या खेळाडूचा पराभव केला होता.

<><><><>

अमेरिकेत ओरेगन राज्यात युजीन इथं सुरु असलेल्या २० वर्षांखालील जागतिक ॲथलेटिक्स स्पर्धेत भारताच्या आशिष यादवनं काल भालाफेक स्पर्धेत रौप्य पदक पटकावत

भारताला पहिलं यश मिळवून दिलं. दक्षिण आफ्रिकेच्या जान-हेन्ड्रिक हेमन्सनं सुवर्ण पदक पटकावलं.

या स्पर्धेत याआधी भारताच्या नीरज चोप्रानं २०१६ मध्ये सुवर्ण पदक पटकावलं होतं.

**<><><><>**

भारत आणि श्रीलंका एकादश यांच्यात कोलंबो इथं सुरु असलेल्या तीन दिवसीय सराव सामन्यात भारतानं आपल्या पहिल्या डावात आतापर्यंत २ बाद१२७ धावा केल्या आहेत. त्याआधी, श्रीलंका एकादश संघानं आज आपला पहिला डाव कालच्याच ८ बाद ३६३ धावसंख्येवर घोषित केला.

**<><><><>**

हिमाचल प्रदेशातल्या चंबा जिल्ह्यात आज सकाळी झालेल्या रस्ते अपघातात एकूण सात जण ठार झाले तर अकरा प्रवासी जखमी झाले आहेत. एक खाजगी बस बैरागढ इथून चंबाच्या दिशेनं जात असताना घाटात घसरुन पडली. अपघाताची माहिती मिळताच पोलीस पथक तातडीनं घटनास्थळी दाखल झालं असून मदत आणि बचावकार्य युद्धपातळीवर सुरु आहे. जखमींना उपचारासाठी चंबा इथल्या पंडित जवाहरलाल नेहरू शासकीय रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. मृतांची ओळख पटवण्याचं काम अद्याप सुरु आहे. तसंच अपघाताचं कारण शोधण्याचा प्रयत्न सुरु असून विविध विभागांची पथकं घटनास्थळी तैनात करण्यात आली आहेत.

या अपघाताबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. अपघातात मरण पावलेल्यांच्या कुटुंबांप्रती त्यांनी शोक संवेदना व्यक्त केल्या असून जखमींच्या तब्येतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी सदिच्छा प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमांवर व्यक्त केली आहे.

कर्नाटकात कोट्टीगेहराजवळ एलपीजी सिलेंडर्सनं भरलेल्या ट्रकची एका कारला धडक बसल्यानं झालेल्या अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला तर दोन जण जखमी झाले . जखमींना स्थानिकांनी जवळच्या रुग्णालयात तातडीनं दाखल केलं असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचं वृत्त आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले असून या संदर्भात पुढील तपास सुरु असल्याचं स्थानिक पोलिसांनी सांगितलं.

महाराष्ट्राच्या जालना जिल्ह्यात काल रात्री एक भरधाव कार विहिरीत कोसळून झालेल्या अपघातात एकाच कुटुंबातल्या दोन महिलांचा मृत्यू झाला, तर कारमधले अन्य

दोनजण गंभीर जखमी झाले. कारला दुचाकीस्वारानं धडक दिल्यानं चालकाचं वाहनावरचं नियंत्रण सुटलं आणि कार रस्त्यालगतच्या विहिरीत कोसळली, अशी प्राथमिक माहिती मिळाली आहे.

**<><><><><>**

देशाच्या उत्तरभागात मोसमी पावसाचा जोर कायम असून विविध राज्यात मुसळधार पावसामुळे जनजीवन प्रभावित झालं आहे.

जम्मू काश्मीरमधे संततधार पावसामुळे जम्मू श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावर दरडी कोसळण्याची शक्यता लक्षात घेऊन अमरनाथ यात्रा आज थांबवण्यात आली आहे.

हिमाचल प्रदेशात सर्वदूर पाऊस होत आहे. अनेक ठिकाणी वीज आणि पाणीपुरवठ्यावर परिणाम झाला आहे. राज्यातले १८५ रस्ते बंद पडले आहेत.

राजस्थानात जोरदार पाऊस होत असून नद्यांची पाणीपातळी वाढली आहे. अनेक ठिकाणी धरणांचे दरवाजे उघडले असून नदी काठच्या रहिवाशांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. अनेक जिल्ह्यांमधे आज शाळांना सुट्टी दिली आहे.

मध्यप्रदेशातल्या ३ जिल्ह्यांमधे नदी प्रवाहात वाढ झाली असून आसपासच्या गावांचा संपर्क तुटला आहे.

आसाममधे पूरस्थिती हळू हळू नियंत्रणात येत आहे. आतापर्यंत राज्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या दुर्घटनांमधे ९७ जणांचा मृत्यू झाला. ७३ निवारा शिबिरांमधे मदतकार्य चालू आहे.

**<><><><><>**

भारतीय हवामान विभागानं आज ओडिशा आणि राजस्थानमध्ये मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचा इशारा दिला आहे. ईशान्य भारत, छत्तीसगड, मध्य प्रदेश, झारखंड, कर्नाटक, उत्तराखंड, पश्चिम बंगाल, केरळ आणि माहे या भागांतही आज वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**